# समिती दर्पण

जानेवारी २०२४

विद्यार्थी साहाय्यक समिती : दूरध्वनी : ०२०-२५५३३६३१, मोबाईल : ९४०४८५५५३०
ईमेल : info@samiti.org, वेबसाईट : www. samiti.org

**समितीविषयी...**

ग्रामीण भागातील हजारो विद्यार्थ्यांच्या जीवनात परिवर्तन घडविणारी संस्था आणि युवा परिवर्तनाचे केंद्र म्हणून विद्यार्थी सहायक समितीच्या कामाकडे पहावे लागेल गुणवत्ता आहे, परंतु पैशांअभावी शहरात येऊन उच्च शिक्षण घेता येत नाही, अशा विद्यार्थ्यांसाठी पुण्यात अतिशय माफक दरात राहण्याची आणि जेवणाची सोय उपलब्ध करून द्यावी, या हेतूने डॉक्टर अच्युतराव आपटे, स्वातंत्र्यसेनानी हरिभाऊ फाटक सुमित्राताई केरकर आदींनी सन १९५५ मध्ये समितीची स्थापना केली. पाच विद्यार्थ्यांची वेगवेगळ्या घरी वाराने जेवणाची सोय करण्यापासून कामाला सुरुवात झाली. आज समितीची पुण्यात पाच वसतिगृह आहेत. त्यात ७५० विद्यार्थी-विद्यार्थिनींची निवास-भोजनाची व्यवस्था तर आहेच, शिवाय त्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी उपक्रम राबविले जात आहेत. स्वच्छता, समता आणि श्रमप्रतिष्ठा त्रिसूत्री वर समितीचे काम चालते.

# समिती ही संस्था नाही तर संस्कार केंद्र

## संदीप वासलेकर यांच्या हस्ते मानपत्र देऊन गौरव

विद्यार्थी साहाय्यक समिती ही केवळ संस्था नाही तर एक संस्कार केंद्र आहे. ग्रामीण भागातील हजारो तरुणांच्या आयुष्याला या संस्थेमुळे परिसस्पर्श लाभला आहे, अशा शब्दांत समितीच्या कामाचा गौरव करण्यात आला.

संदीप वासलेकर यांच्या 'एका दिशेचा शोध' या पुस्तकाच्या पंचविसाव्या आवृत्तीचे प्रकाशन ३१ जानेवारीला टिळक स्मारक मंदिरात झाले. महाराष्ट्र साहित्य कला प्रसारणी सभा आणि पिंपरी चिंचवड युनिव्हर्सिटी यांच्या वतीने झालेल्या या कार्यक्रमात विद्यार्थी साहाय्यक समितीचा मानपत्र देऊन विशेष सन्मान करण्यात आला. संदीप वासलेकर, डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठाचे कुलपती डॉ. पी. डी. पाटील यांच्या हस्ते समितीचे अध्यक्ष प्रतापराव पवार, कार्यकारी विश्वस्त तुषार रंजनकर यांच्यासह विश्वस्त, कार्यकर्ते यांनी हा सन्मान स्वीकारला.

यावेळी महाराष्ट्र साहित्य कला प्रसारणी सभेचे अध्यक्ष सचिन ईटकर, पिंपरी चिंचवड युनिव्हर्सिटीचे कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई, अमेरिकास्थित मराठी उद्योजक आशिष अचलेरकर, राजहंस प्रकाशनचे दिलीप माजगावकर उपस्थित होते.

विसाव्या शतकात साऱ्या जगाच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय आणि धार्मिक जीवनात प्रचंड उलथापालथी झाल्या. अशा या काळात एक संस्था आपल्या श्रद्धापूर्व सेवाकार्याच्या बळावर अस्सलपण टिकवून ठेवू शकली, हीच मोठी गोष्ट आहे. ही संस्था उभी करणाऱ्या पिढीला धन्यता वाटावी, असेच कार्य नंतरच्या पिढीतल्या कार्यकर्त्यांनी चालू ठेवलेले आहे. असे चांगले कार्य समाजापर्यंत पोहोचावे म्हणून संस्थेचा गौरव करत असल्याचे मानपत्रात नमूद केले आहे.

यावेळी वासलेकर यांच्या 'एका दिशेचा शोध' या पुस्तकाच्या नव्या स्वरुपातील सुधारीत आवृत्तीचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते झाले. त्यानंतर 'एका दिशेचा शोध आणि दिशा शोधणारी माणसे' या परिसंवादात संदीप वासलेकर यांनी कृषी विज्ञान प्रतिष्ठानच्या विश्वस्त सुनंदा पवार, नाशिकच्या सह्याद्री फार्मचे विलास शिंदे, टौरल इंडियाचे संचालक भरत गिते, कॉमसेन्सचे संस्थापक सागर बाबर, लंडनस्थित युवा उद्योजक आर्या तावरे यांच्याशी संवाद साधला. गेल्या १४ वर्षात त्यांनी केलेली प्रगती, यशाचे गमक आणि भविष्यातील योजनांबाबत चर्चा केली.




### उद्योजकांनी सांगितली यशाची चतुःसूत्री

- कायम भविष्याचा वेध घ्या.
- सामाजिक बांधिलकी जपा, नैतिकतेच्या चौकटीत उद्योग- व्यवसाय करा.
- ग्रामीण भागातील असलात, तरी आंतरराष्ट्रीय घडामोडींचे भान ठेवा. जागतिक पातळीवरील यश निश्चित मिळेल
- परिवर्तनासाठी पिढ्यांची वाट पाहावी लागत नाही, ते दहा-बारा वर्षांतच होते.




" नियती आणि निश्चयाचा गुणाकार केला तर नवनिर्मिती होते, हा आयुष्याचा मूलमंत्र आहे. जगाच्यामागे न धावता विद्यार्थ्यांनी स्वतःच्या नियतीची ओळख करून घ्यावी. त्याला निश्चयाची जोड द्यावी. यशासाठी निश्चय करणे आवश्यक आहे.

**- संदीप वासलेकर**

" केल्याने होत आहे, आधी केलेची पाहिजे, हे तत्व विद्यार्थ्यांनी अंगिकारावे. तुम्ही कोठून आलात, साधने काय आहेत, यापेक्षा तुमच्याकडे प्रचंड इच्छाशक्ती, महत्त्वाकांक्षा असेल तर तुम्ही यशस्वी व्हाल. भीतीवर मात करा, कोणतीही गोष्ट अशक्य नाही.

**- आशिष अचलेरकर**

# पुस्तकरुपी जिवलग मित्र, वाचनरुपी गुंतवणूक

## युवा साहित्य संमेलनात विद्यार्थ्यांना मिळाला वैचारिक खजिना

पुस्तकांशी मैत्री करा, ती तुम्हाला सावरतील, कायम आधार देतील, तर वाचन ही कमी खर्चात, कमी वेळेत आणि कमी श्रमात जास्त परतावा देणारी गुंतवणूक आहे, या संदेशाबरोबरच काय वाचावे आणि कसे वाचावे, याचे उत्तम मार्गदर्शन समितीतील विद्यार्थ्यांना नामवंत वक्त्यांकडून मिळाले.

निमित्त होते विद्यार्थी साहाय्यक समिती आणि महाराष्ट्र साहित्य परिषदेने आयोजित केलेल्या युवा साहित्य संमेलनाचे. समितीच्या डॉ. आपटे वसतिगृहातील मोडक सभागृहात १५ ते १७ जानेवारी दरम्यान झालेल्या या तीन दिवसीय संमेलनाला महाराष्ट्र साहित्य परिषदेचे कार्याध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी, प्रमुख कार्यवाह सुनीताराजे पवार, समितीचे कार्यकारी विश्वस्त तुषार रंजनकर, मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत कुलकर्णी, विद्यार्थी विकास केंद्राच्या अध्यक्ष सुप्रिया केळवकर आदी उपस्थित होते. या युवा साहित्य संमेलनाचे अध्यक्ष लेखक, कवी, दंतवैद्य डॉ. आशुतोष जावडेकर यांनी पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. व्याख्यानानंतर विद्यार्थ्यांबरोबरचा त्यांचा संवाद विशेष रंगला. विद्यार्थ्यांच्या सर्व शंकांचे त्यांनी युवा पिढीला समजेल अशाच भाषेत निरसन केले. ग्रंथाली देशमुख हिने सूत्रसंचालन केले. स्नेहल कुलकर्णी हिने आभार मानले.

### कवी संमेलनात विद्यार्थ्यांचा सहभाग

संमेलनात दुसऱ्या दिवशी कवितांची मैफल रंगली. अंजली कुलकर्णी, देवा झिंजाड, बंडा जोशी, मृणालिनी कानिटकर- जोशी या प्रसिद्ध कवींबरोबर समितीतील नवोदित कवींनीही या मैफिलीत सहभाग घेतला. साक्षी थोरात, मेहंदी बडदे, जमुना सोळंकी, प्राजक्ता क्षीरसागर, प्रमिला केळे या विद्यार्थिनींनी स्वरचित कविता सादर केल्या.

### काय वाचावे, कसे वाचावे?

संमेलनाचा समारोप तिसऱ्या दिवशी प्रसिद्ध वक्ते, 'साधना'चे संपादक विनोद शिरसाठ यांच्या व्याख्यानाने झाला. वाचावे काय आणि कसे, याविषयी त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. वाचनाची साधने आणि कौशल्ये याबाबत बोलताना त्यांनी पुस्तकांची निवड कशी करावी, सम्यक सकारात्मक वाचन म्हणजे काय, वाचनाने आत्मिक उन्नती होते, भाषा प्रगल्भ होते, याविषयी विस्ताराने सांगितले. समीक्षा नाणेकर हिने परिचय करून दिला. स्वामिनी कुलकर्णी हिने सूत्रसंचालन केले. ओंकार शिंदे याने आभार मानले.

" युवा पिढी तंत्रस्नेही आहे, तिची वाचनाची माध्यमे बदलली आहेत. मात्र तरुणांनी तंत्रज्ञानाबरोबर तत्वज्ञानही स्वीकारावे. पाठ्यपुस्तकाबाहेरचे विश्व जाणून घेण्यासाठी पुस्तकांशी मैत्री करावी. स्वतःला साहित्याशी जोडून घ्यावे. मुक्तपणे जगण्याचा आनंद घेताना विवेक सोडू नये.

**- डॉ. आशुतोष जावडेकर**

" वाचनाने सभोवतालचे अधिक चांगले, सुसंगत आणि समग्र भान येते. वाचन ही गुंतवणूक आहे, जी तुम्हाला मोठा परतावा देते. वाचनामुळे तुमचा जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन तयार होतो. सर्व प्रकारची पुस्तके वाचावीत. जे विषय फारसे रुचत नाहीत, त्यांची किमान चव घ्यावी, आवडीचे विषय चवीने वाचावेत.

**- विनोद शिरसाठ,** संपादक, साधना







### युवकांचा उत्साह आणि ऊर्जा

नवी पिढी वाचत नाही, गंभीर विषय ऐकत नाही, असे सर्वसाधारणपणे म्हटले जाते. पण संमेलनाची उपस्थिती या विधानाला छेद देणारी होती. तीनही दिवस सभागृह विद्यार्थी-विद्यार्थिनींनी भरगच्च होते. दोन्ही व्याख्यानांना उत्स्फूर्त दाद मिळाली. विद्यार्थ्यांना त्यातून वेगळी ऊर्जा मिळाल्याचे त्यांच्या प्रश्नांवरून दिसून आले. मनातील शंकांना वक्त्यांकडून समाधानकारक उत्तरे मिळाल्याने विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद दिसत होता.

### छोटेसे पुस्तक प्रदर्शन

समितीच्या तिन्ही ग्रंथालयांतील विद्यार्थी प्रमुखांनी या संमेलनाच्या निमित्ताने छोटेसे पुस्तक प्रदर्शन भरवले होते. यात समिती प्रकाशनाच्या पुस्तकांबरोबरच काही अवांतर वाचनाची पुस्तके ठेवली होती. विद्यार्थ्यांनी पुस्तक वाचन करून त्यावर लिहिलेले अभिप्रायही प्रदर्शनात मांडले होते.

### काळ्या केसांचे संमेलन

साहित्य संमेलन म्हटले की श्रोत्यांमध्ये पांढरे केस ठरलेलेच. या संमेलनाचे श्रोते विशीतले, काळ्या केसांचे आहेत, असा उल्लेख मसापचे कार्याध्यक्ष मिलिंद जोशी यांनी केला. साहित्य ज्यांच्यापर्यंत पोचायला हवे, अशा तरुणाईसाठी हे संमेलन होत असल्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले.

मनोगत

## यूट्युबकडून मिळाले सिल्व्हर प्ले बटन

गेल्या वर्षी २० जानेवारीला मला समितीकडून लॅपटॉप मिळाला. त्याचा मला खूप फायदा झाला. मला ग्राफिक डिझायनिंग व कंटेट क्रिएशन या क्षेत्राची आवड असल्याने समितीकडून मी आधीच एसपीसीटीच्या अक्षय शिक्षण योजनेंतर्गत क्लिक ग्राफिक डिझाईनचा कोर्स पूर्ण केला होता. त्यातून मी समितीच्या सोशल मीडियासाठी, तसेच इतर कामे "कमवा शिका" योजनेअंतर्गत करू लागलो.

त्यानंतर मी एक हिंदी यूट्युब चॅनेल तयार केले. एक ते दीड महिना मी त्यावर व्हिडीओ अपलोड करत होतो, परंतु त्यात फारशे यश येत नव्हते. त्यानंतर समितीच्या विद्यार्थी विकास केंद्राच्या एका कार्यक्रमादरम्यान मला एक गोष्ट लक्षात आली, ती म्हणजे अनेक सामान्य मराठी माणसांनी वेगवेगळ्या क्षेत्रांत मोलाची कामगिरी बजावली आहे, परंतु त्यांच्यावर एकही व्हिडीओ किंवा माहिती यूट्युबवर उपलब्ध नाही. त्यामुळे मी ठरवले, की अशा सामान्य मराठी माणसांसाठी एक यूट्यूब चॅनेल करायचे. त्याद्वारे खडतर परिस्थितीवर मात करून आपल्या क्षेत्रात मोलाची कामगिरी करणाऱ्या व्यक्तींची ओळख तरुणाईला करून द्यायची. ज्या व्यक्तींची माहिती प्रसारमाध्यमांतून जनतेसमोर आलेली नाही, त्या प्रत्येक माणसाचा व्हिडीओ तयार करून आपल्या चॅनेलवर टाकायचा, असे मी ठरवले. त्यासाठी MARATHI MANUS हे यूट्युब चॅनेल व इंस्टाग्राम पेज सुरू केले. सुरुवातीला हवा तेवढा प्रतिसाद मिळाला नाही. पण मी प्रयत्न सोडला नाही. व्हिडिओ तयार करत राहिलो. त्यातील एक व्हिडिओ व्हायरल झाला आणि माझ्या चॅनेलला १० हजार सबस्क्रायबर मिळाले. मी ही गोष्ट समितीचे कार्यकारी विश्वस्त तुषार रंजनकर यांना सांगितली. सरांनी प्रोत्साहन दिले. त्यानंतर मी व्हिडीओ टाकत राहिलो आणि एक दिवस माझ्या चॅनेलच्या सबस्क्रायबरची संख्या एक लाख झाली. यूट्युबकडून मला २६ डिसेंबरला सिल्व्हर प्ले बटन मिळाले. ही गोष्ट माझ्यासाठी खूप आनंददायी होती. मला मराठी माणूस हा यूट्युब चॅनेल असा प्लॅटफॉर्म बनवायचा आहे, ज्यातून मराठी माणसांचे व्यवसाय, त्यांची कामगिरी लोकांपर्यंत पोहोचेल. त्यातून मराठी मुलांना प्रेरणा मिळेल. हे सर्व समितीतील उपक्रमामुळे व समितीने मला वेळोवेळी केलेल्या मदतीमुळे शक्य झाले. धन्यवाद समिती.

**- रामेश्वर प्रल्हाद आव्हाड,** पी. डी. कारखानीस वसतिगृह

## उत्कृष्ट 'कमवा- शिका' करणाऱ्या दहा विद्यार्थ्यांचे कौतुक

समितीतर्फे दरवर्षी कमवा- शिका योजनेत उत्तम काम करणाऱ्या मुलांचे प्रमाणपत्र व शिष्यवृत्ती देऊन कौतुक करण्यात येते. या वर्षी समितीच्या विश्वस्त विनया ठोंबरे यांचा मुलगा ..... याने वडिलांच्या स्मृतीनिमित्त दहा विद्यार्थी- विद्यार्थिनींना शिष्यवृत्ती दिली. कार्यकारी विश्वस्त तुषार रंजनकर व विनयाताई यांच्या हस्ते या दहा जणांचा सत्कार करण्यात आला. यावेळी श्रीधर कुलकर्णी, शुभांगी चिरपुटकर, चंद्रकांत कुलकर्णी, कुंदन पठारे व सर्व वसतिगृहांचे पर्यवेक्षक उपस्थित होते. कमवा- शिका योजना ही विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासासाठी कशी महत्त्वाची आहे, हे रंजनकर, ठोंबरे, कुलकर्णी यांनी सांगितले. निवड झालेल्या मुलामुलींची नावे- निकिता वाघमारे, साक्षी जगताप, कल्याणी पोटे, भाग्यश्री सानप, सोहम देशमुख, दर्शन खोडे, विनोद तेजबंद, महादेव पाटील, मयूर लहांगे, वीरेंद्र पाटील. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कल्याणी लहाने यांनी, तर आभार प्रदर्शन राहुल माने यांनी केले.

## तेज निवळीकर यांचे मार्गदर्शन

कमवा- शिका ही केवळ शिकत असताना कमाईसाठीची योजना नाही, तर त्यातून विद्यार्थ्यांचा शारीरिक आणि मानसिक विकास होतो. या योजनेचे उद्दिष्ट, कमवा- शिका करत असताना कोणत्या गोष्टी महत्त्वाच्या असतात, याच गोष्टी भविष्यात कोणती भूमिका बजावतात, याविषयी समितीचे विश्वस्त तेज निवळीकर यांनी विद्यार्थी- विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले. डॉ. आपटे वसतिगृह आणि लजपत भवन येथे मार्गदर्शन सत्र पार पडले. यात श्री. निवळीकर यांनी समाज कसा वाचावा, औपचारिक व अनौपचारिक शिक्षण याविषयी सांगताना प्रत्येक काम प्रामाणिकपणे करावे, असा संदेशही श्री. निवळीकर यांनी मुलामुलींना दिला.

## 'आयुका'मध्ये शैक्षणिक दौरा

समितीतील विद्यार्थ्यांचा २९ डिसेंबरला आयुका (IUCAA) संस्थेत शैक्षणिक दौरा आयोजित केला होता. या दौऱ्यात सुरुवातीला जे. बी. जोशी (मराठी विज्ञान परिषद, होमी भाभा राष्ट्रीय संस्था, मुंबई) यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. दुसऱ्या टप्प्यात विद्यार्थ्यांनी आकाश निरीक्षणाचा आनंद लुटला. शनी आणि प्लुटो यांचे निरीक्षण केले. त्यानंतर विद्यार्थ्यांना नक्षत्रांची माहिती देण्यात आली.

## डॉ. आपटे जयंतीनिमित्त स्पर्धा

डॉ. अच्युतराव आपटे यांच्या जयंतीनिमित्त सामाजिक जाणीव प्रकल्पांतर्गत १३ जानेवारी रोजी वीर बाजीप्रभू देशपांडे शाळेत वक्तृत्व व चित्रकला स्पर्धेचे आयोजन केले होते. शाळेतील विद्यार्थ्यांनी त्यात मोठा सहभाग नोंदवला. समितीच्या सामाजिक जाणीव प्रकल्पामध्ये काम करणारे ओंकार शिंदे अनिकेत राख, मोहित लांजेवार, सौरभ कोकरे, अतुल सोनार, विनायक लामखडे, समीर परब या विद्यार्थ्यांसह पर्यवेक्षक सचिन खांडेकर उपस्थित होते.

# ...म्हणून आम्हाला रात्री शांत झोप लागते

## विद्यार्थी साहाय्यक समितीतील विद्यार्थ्यांच्या पालकांची प्रतिक्रिया

**पुणे** - 'पाल्याला शहरात शिक्षणासाठी पाठविल्यानंतर तो किंवा ती बिघडणार नाही ना, त्याला योग्य संगत मिळेल ना, या धास्तीने पालकांना झोप लागत नाही, पण आमचा पाल्य विद्यार्थी साहाय्यक समितीच्या वसतिगृहात राहात असल्यामुळे आम्ही निर्धास्त आहोत, आम्हाला रात्री शांत झोप लागते...' ही प्रतिक्रिया आहे समितीच्या वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांच्या पालकांची.

प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने विद्यार्थी साहाय्यक समितीत पालक मेळावा आयोजित करण्यात आला होता. यात विद्यार्थ्यांचे विविध गावांतून आलेले पालक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. या मेळाव्याला समितीचे अध्यक्ष प्रतापराव पवार तसेच समितीचे हितचिंतक, सहाय्यदाते उपस्थित होते. कार्यकारी विश्वस्त तुषार रंजनकर यांनी प्रास्ताविकात मेळाव्याचे उद्दिष्ट स्पष्ट केले.

'समितीतील शिस्त आणि संस्कार यामुळे आपल्या पाल्याच्या व्यक्तिमत्त्वात काही काळातच मोठा बदल झाल्याचे जाणवले. समितीत आल्यानंतर येथील वातावरण पाहिले. त्यामुळे आपल्या मुलामुलींचे भविष्य उज्ज्वल आहे, याची खात्री पटली,' अशा भावना विठ्ठल गंगाणे, कविता आळंदे, राणी माने, राजू बडदे, श्रीधर गायकवाड, पूजा शेवाळे, दत्तात्रेय शिंदे यांनी व्यक्त केल्या. समितीत मुलांची पालकांपेक्षाही जास्त आस्थेने काळजी घेतली जात असल्याने त्यांच्या भवितव्याबाबत आपण निश्चिंत झाल्याचे या पालकांनी सांगितले.

समितीत रोज सकाळी अनिवार्य असणारे योग वर्ग, विद्यार्थ्यांकडूनच केलेले जाणारे समितीतील उपक्रमांचे व्यवस्थापन, विविध योजना यामुळे आपल्या व्यक्तिमत्त्वात सकारात्मक बदल झाल्याचे, आत्मविश्वास निर्माण झाल्याचे प्रतीक पाटील, अंशुकुमारी, वैदेही, श्रुती भोसले या विद्यार्थ्यांनी मनोगतात सांगितले. मेहंदी बडदे हिने कविता सादर केली.

समितीतील विद्यार्थ्यांची दिनचर्या कशी असते, समितीच्या विविध योजनांमध्ये विद्यार्थ्यांचा सहभाग कसा असतो, याची माहिती मुलींनी नाटिकेच्या माध्यमातून दिली.

### विद्यार्थ्यांकडून दिवाळी निधीचा १५ लाखांचा धनादेश सुपूर्त

समितीचे संपूर्ण कामकाज हे समाजातील दानशूर व्यक्तींकडून मिळणाऱ्या देणग्यांवर चालते. या देणग्या मिळविण्यासाठी किती कष्ट घ्यावे लागतात, याची जाणीव विद्यार्थ्यांना व्हावी, तसेच समितीच्या कामात त्यांचाही खारीचा वाटा असावा, या उद्देशाने दरवर्षी दिवाळीच्या सुटीत विद्यार्थ्यांना प्रत्येकी १०० रुपये याप्रमाणे वीस पावत्यांचे पुस्तक दिले जाते. त्यातून त्यांनी दोन हजार रुपये देणगी जमा करायची असते. या योजनेतून यंदा विद्यार्थ्यांनी जमा केलेल्या दिवाळी निधीचा १५ लाख रुपयांचा धनादेश यावेळी समितीचे अध्यक्ष प्रतापराव पवार यांच्याकडे सुपूर्त करण्यात आला.

### विद्यार्थ्यांच्या कलागुणांचे दर्शन

प्रजासत्ताक दिनानिमित्त विद्यार्थ्यांच्या कलागुणांचे दर्शन घडविणाऱ्या प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. भित्तीचित्रे, व्यंगचित्रे, रांगोळी अशी विविध कलाकृतींसह विज्ञान प्रकल्पांचाही या प्रदर्शनात समावेश होता. या माध्यमातून विद्यार्थ्यांची स्पर्धाही घेण्यात आली.

### स्पर्धेचा निकाल पुढीलप्रमाणे

- **रांगोळी स्पर्धा**- प्रथम- सिद्धी कदम, संस्कृती काप्रे, द्वितीय- धनश्री कुंभार, साक्षी थोरात, तृतीय- मधुरा मांढरे, हर्षिका पुल्लीवार
- **पोस्टर स्पर्धा**- प्रथम- पवन मांडगे, द्वितीय- वैष्णवी खांबेकर, शिवांजली घोडके व प्रांजल चोपडे
- **तृतीय**- समृद्धी कोल्हे, सुमित परब
- **हस्ताक्षर**- प्रथम- शीतल जगताप, द्वितीय- धनश्री गवई, तृतीय- हर्षल पाटील
- **व्यंगचित्र**- प्रथम- सुधीर मांजरेकर, द्वितीय- चैत्राली कुलकर्णी, तृतीय- साक्षी ठाकूर
- **फोटोग्राफी**- प्रथम- उत्कर्ष भोवार, द्वितीय- मानसी शिनलकर, समृद्धी चौहान, तृतीय- मोहित लांजेवार
- **विज्ञान प्रकल्प**- प्रथम- आकाश दुबे आणि टीम, द्वितीय- समृद्धी कोल्हे, तृतीय- सौरभ राऊत.



## सुशील बोर्डे यांच्या हस्ते 'लजपत'मध्ये झेंडावंदन

प्रजासत्ताक दिनानिमित्त समितीच्या डॉ. आपटे वसतिगृहात सुप्रिया केळवकर यांच्या हस्ते, सुमित्रा सदनमध्ये अरुणा अत्रे यांच्या हस्ते आणि लजपत वसतिगृहात रिलायन्स इनोव्हेशन लीडरशीप सेंटरचे प्रमुख सुशील बोर्डे यांच्या हस्ते झेंडावंदन झाले. यावेळी विद्यार्थी- विद्यार्थिनींनी मोबाईलचे दुष्परिणाम या विषयावर पथनाट्य सादर केले. वेगवेगळ्या क्षेत्रांत ठसा उमटविणारे पाच माजी आणि पाच आजी विद्यार्थ्यांचा यावेळी श्री. बोर्डे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

> तुम्ही सारे खूप भाग्यवान आहात. समितीत तुम्हाला जी मूल्ये, संस्कार, विचार मिळत आहेत, अशाच संस्कारांतून अनेक मोठ्या व्यक्ती घडल्या आहेत. तसेच तुमचेही भवितव्य घडणार आहे.
>
> **- सुशील बोर्डे,** प्रमुख, रिलायन्स इनोव्हेशन लीडरशीप सेंटर

# वंचितांसाठी झटणाऱ्या हातांचा सन्मान

## पुरव- सामंत, पटवर्धन यांना वसुधा परांजपे स्मृती पुरस्कार प्रदान

झोपडपट्टीत राहणाऱ्या वंचित महिलांना बँकांकडून कर्ज घेऊन देत, त्यांना स्वतःच्या पायावर उभे करत सामाजिक उद्योग उभारणाऱ्या अन्नपूर्णा परिवाराच्या मेधा पुरव- सामंत आणि वंचित घटकांतील मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणून त्यांचे आयुष्य घडविणाऱ्या स्व- रुपवर्धिनी संस्थेचे शिरीष पटवर्धन यांना यावर्षीचा कै. वसुधा परांजपे स्मृती पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

ज्येष्ठ विचारवंत, विश्वकोश निर्मिती मंडळाचे अध्यक्ष डॉ. राजा दीक्षित यांच्या हस्ते १५ जानेवारी रोजी या पुरस्कारांचे वितरण झाले. मानपत्र व ५० हजार रुपये असे या पुरस्काराचे स्वरुप आहे. समितीच्या डॉ. आपटे वसतिगृहातील मोडक सभागृहात झालेल्या या कार्यक्रमात समितीतील वैष्णवी उगले, प्रगती वायकुळे, दुर्गा पिंगळे, भाग्यश्री सानप, मानसी सोनवणे या पाच विद्यार्थिनींना प्रत्येक १० हजार रुपयांची शिष्यवृत्ती देण्यात आली. यावेळी ज्येष्ठ भाषातज्ज्ञ डॉ. प्र. ना. परांजपे, समितीचे कार्यकारी विश्वस्त तुषार रंजनकर तसेच परांजपे कुटुंबीय उपस्थित होते. डॉ. उज्वला बर्वे, अपर्णा महाजन यांनी मेधा सामंत व शिरीष पटवर्धन यांचा परिचय करून दिला. परिमल चौधरी यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. विजया देव यांनी आभार मानले.

> संपत्ती निर्मितीत ८० ते ९० टक्के वाटा महिलांचा असतो, मात्र मालकी त्यांच्याकडे नसते. त्यामुळे अन्नपूर्णा क्रेडीट सोसायटीमार्फत स्वतः जामीन राहात वंचित महिलांना आतापर्यंत तीन हजार कोटींचे कर्ज मिळवून दिले आणि त्यांना स्वतःच्या पायावर उभे केले. हे सामाजिक काम नव्हे, तर सामाजिक उद्योग आहे, ज्याचा लाभ सव्वा लाख महिला घेत आहेत.
>
> **- मेधा पुरव- सामंत,** अन्नपूर्णा परिवार

> आतापर्यंत हजारो गरीब होतकरू मुलांना चांगले शिक्षण, चांगला सहवास देत त्यांचे आयुष्य घडविण्याचे काम स्व- रुपवर्धिनीने केले आहे. चांगल्या कामासाठी समाज नेहमीच मदतीचा हात देतो. ही सज्जन शक्ती अधिकाधिक समृद्ध आणि सक्रिय झाली, तर समाजातील अनेक प्रश्न सुटण्यास मदत होईल.
>
> **- शिरीष पटवर्धन,** स्व- रुपवर्धिनी संस्था

> गरीबी हा गुन्हा नाही, त्यावर मात करता येते. त्यामुळे विद्यार्थ्यांनी त्याचा न्यूनगंड बाळगू नये. आत्मविश्वास बाळगावा. पैसा कमावता येतो, पण त्याचा योग्य विनियोगही करता आला पाहिजे. सुख नेमके कशात आहे, हे समजून घेतले पाहिजे. सुख म्हणजे साध्य नव्हे. सुखाला विवेकाची जोड हवी.
>
> **- डॉ. राजा दीक्षित,** अध्यक्ष, विश्वकोश निर्मिती मंडळ

